महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना

२८ वा वार्षिक अहवाल सन २०२३ - २०२४

व्यवसाय वृद्धी

(आकडे कोटीमध्ये)



महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना

रजि. क्र. जे.ए.एल./जे.ए.एल./आर.एस.आर./सी.आर./३४८/१९९५–९६ दिनांक : १९/०२/१९९६
मुख्य कार्यालय : मस्तगड, जालना–४३१ २१३. ☎ ०२४८२–२३२७४२, २३३७४२, २४३२४६
E-mail : mahalaxmi.jalna@gmail.com

जा.क्र.: दिनांक :

अधिमंडळाची वार्षिक बैठक सुचनापत्र

(फक्त सभासदांकरीता)

महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालनाची सन २०२३-२४ ची अधिमंडळाची २८ वी वार्षिक बैठक रविवार, दिनांक २५ / ०८ / २०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता पाठक मंगल कार्यालय, मुक्तेश्वर द्वार जवळ, जुना जालना येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. दादाराव तुपकर यांचे अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, हि नम्र विनंती.

बैठकीपुढील विषय :

१) दि. ०२/०७/२०२३ रोजी झालेल्या अधिमंडळाचे मागील वार्षिक बैठकीचा वृतांत वाचून कायम करणे.
२) संचालक मंडळाच्या संस्थेच्या कार्याबद्दलच्या सन २०२३–२४ च्या वार्षिक अहवालाचे वाचन करणे व तो स्विकृत करणे.
३) सन २०२३-२४ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्विकृत करणे.
४) वैधानिक लेखापरीक्षकाचे सन २०२३–२४ चे लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
५) सन २०२२-२३ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे दोषदुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
६) कायदा व नियम यास अनुसरून संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
७) सन २०२४-२५ करीताचे उत्पन्न खर्चाचे व महसूल खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
८) सन २०२३-२४ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रक तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
९) निबंधकांनी जाहीर केलेल्या पॅनालमधील पात्र वैधानिक लेखापरीक्षकाची चालू आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्यासाठी नेमणूक करणे, लेखापरिक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.
१०) संचालक मंडळ व त्यांचे कुटुंबातील सदस्यांना दिलेल्या, वसूल व येणे कर्जाची कायदा कलम ७५(२)(१) नुसार माहिती घेणे.
११) संस्थेची उपविधी क्र. ३४ दुरुस्ती करणे.
१२) उपविधी क्र. ६१(४) चे तरतुदीस अनुसरून ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीचा न नेलेला लाभांश राखीव निधीकडे वर्ग करणे.
१३) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळ यांचे आज्ञेवरून

स्थळ : जालना
जा. क्र.: १३८/ २०२४
दिनांक : ०८ / ०८ /२०२४

(शिवलिंग कंदळे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

टिप :

१) संस्थेचे उपविधी क्र. ३५(३) मधील तरतुदीनुसार सदर अधिमंडळाची वार्षिक बैठक गणपूर्तीअभावी होऊ न शकल्यास सदरील बैठक तहकूब करून, अर्ध्या तासाने त्याच दिवशी व त्याच ठिकाणी म्हणजे दि. २५/०८/२०२४ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता विषयपत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचे विचारार्थ व निर्णयार्थ होईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) ज्या सभासदांना विषयपत्रिकेवरील विषयांचे अनुषंगाने काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी लेखी सूचना सभेचे आधी ७ दिवस या संस्थेच्या Email ID – mahalaxmi.jalna@gmail.com वर कार्यालयाकडे पाठविण्यात याव्यात.

३) ज्या सभासदांना सभेची नोटीस अथवा अहवाल पाहिजे असल्यास त्यांनी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संस्थेच्या 7559394857 या क्रमांकावर WhatsApp द्वारे मागणी करावी, किंवा संस्थेच्या वर नमूद Email ID वर Email द्वारे मागणी करावी. आलेल्या WhatsApp क्रमांकावर / Email ID वर PDF Format मध्ये नोटीस व अहवाल पाठविण्यात येईल.

४) ज्या सभासदांनी संस्थेकडे मोबाईल नंबर नोंदवला नसेल किंवा संस्थेकडे नोंदवलेला मोबाईल नंबर बदलावयाचा असेल त्यांनी तो लगतच्या शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत दिनांक १९/०८/२०२४ पर्यंत नोंदवून / दुरुस्ती करून घ्यावा.

* संचालक मंडळ *

श्री. दादाराव भाऊराव तुपकर (अध्यक्ष)

श्री. संतोष शंकरराव गुडधे (उपाध्यक्ष)

डॉ. जगन्नाथ रामभाऊ खंडागळे, श्री. त्र्यंबक किसनराव मगर, श्री. किसन बाळाजी मिसाळ,
श्री. एकनाथ पंढरीनाथ कदम, श्री. भाऊराव आसाराम चव्हाण, श्री. विठ्ठल केरबा काचेवाड,
श्री. शरद बाबुराव खोत, श्री. सचिन भाऊराव टेकाळे, श्री. नितीन श्रीरंग भोईटे,
श्रीमती मंगला श्रीकांत शेलगावकर, श्रीमती वर्षा नामदेवराव पितळे.

तज्ञ संचालक : श्री. दिपक दादाराव तुपकर, ॲड. जगन्नाथ साहेबराव भुतेकर.

* स्थानिक शाखा सल्लागार मंडळ *

* वालसावंगी शाखा *

श्री. राजू अशोक भुते, श्री.अनिल सुधाकर जोडपे, श्री. हरिभाऊ विठोबा बेराड,
श्री. नामदेव महादू लोखंडे, श्री. रमेश गोविंदराव सुरडकर, श्री. दिपक रामभाऊ तायडे,
श्री. सोमनाथ मधुकरअप्पा घोडतुरे, श्री. राजू उत्तमराव उदरभरे

* रोहिलागड शाखा *

श्री. केशव नारायणराव तट्टू पाटील, श्री. अर्जुन भीमराव टकले, श्री. महादेव श्रीमंतराव हुसे

* परतूर शाखा *

श्री. राजेश नागोराव अंभुरे, श्री. अशोक बिसनलाल सारडा, श्री. संतोष लक्ष्मणराव दिंडे,
श्री. नितीन रामदास खरात, श्री. रामराव अंशिराम काळे,

संस्थेच्या शाखा

अ.क्र.	शाखा	पत्ता
१	मुख्य शाखा, जालना	मस्तगड, जुना जालना, जालना
२	वालसावंगी	मेन रोड, वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना.
३	नवा जालना	रामा आर्केड गणेश भुवन समोर, आझाद मैदान रोड, जालना.
४	रोहिलागड	रोहिलागड, ता. अंबड, जि. जालना.
५	परतूर	हर्षवर्धन कॉम्प्लेक्स, शासकीय विश्रामगृहासमोर, परतूर.

आर्थिक वर्ष २०२३-२४ नफा विभागणी शिफारस

अ.क्र.	तपशिल	रक्कम
१	राखीव निधी (किमान २५%)	३०,७७,०००.००
२	सभासद लाभांश १०%	३२,३६,९६१.००
३	सभासद कल्याण निधी	२,००,०००.००
४	कॉन्टीजेन्सी तरतुद	३०,००,०००.००
५	धर्मदाय निधी	५,००,०००.००
७	उर्वरित नफा ईमारत निधीस वर्ग	२२,९४,०३०.३८
	एकूण नफा :	१,२३,०७,९९१.३८

संस्था प्रगतीवर एक दृष्टीक्षेप

तपशिल	३१/०३/२०२०	३१/०३/२०२१	३१/०३/२०२२	३१/०३/२०२३	३१/०३/२०२४
१ सभासद संख्या	५५९३	६३४५	६७०६	७०७७	७६०२
२ सरासरी खेळते भांडवल	४९,१७,८३,०८२/-	५३,६१,१५,८६२/-	५६,५५,४०,१०४/-	६३,२८,२६,१४६/-	६९,९७,३५,०२५/-
३ स्वनिधी	६,०७,८०,१७६/-	६,१४,८८,६४०/-	७,२३,८२,४७७/-	७,५७,७३,२१८/-	८,३४,६४,०३१/-
४ वसूल भागभांडवल	२,९७,९४,०००/-	३,११,४३,३००/-	३,२५,१०,९००/-	३,३२,०८,०००/-	३,३७,८४,०००/-
५ निधी/तरतुदी	७,१२,९५,३१२/-	८,३२,८७,६००/-	९,८४,९१,६९३/-	११,०४,५१,७८०/-	११,२६,३४,४९१/-
६ ठेवी	३७,८८,४१,०४०/-	४०,८२,२६,५७४/-	४६,२०,२८,९०९/-	४८,५०,८३,३९४/-	५६,३३,१२,५८७/-
७ गुंतवणूक (बँक)	१३,६२,४२,६२७/-	१३,२७,१३,४९५/-	१५,१४,६८,०११/-	१४,६९,१५,१३८/-	२१,३१,०८,००८/-
८ कर्ज वाटप (अहवाल वर्ष)	२२,७२,६९,५४६/-	१८,७६,३२,१००/-	३५,८९,००,२२९/-	३९,३९,७८,२५४/-	४४,७७,९४,५९५/-
९ कर्ज वसुली (अहवाल वर्ष)	२०,७५,०२,५७४/-	१५,०६,३६,९३९/-	३२,०६,२८,१९१/-	३६,३५,०९,८४०/-	४३,२७,५७,५८२/-
१० येणे कर्जबाकी	२८,५०,७४,६३९/-	३२,२०,६९,८००/-	३६,०३,४१,८३८/-	३९,०८,१०,२५२/-	४०,५८,४७,२६५/-
११ थकबाकी (एनपीए) रु.	४,३०,११,०००/-	४,९४,००,३६८/-	४,७२,६९,४४२/-	४,४१,२७,५७३/-	२,७५,५५,०४१/-
१२ ग्रॉस एन.पी.ए. %	१५.०९%	१५.३४%	१३.१२%	११.२९%	६.७९%
१३ नेट एन.पी.ए. %	६.४०%	७.२७%	५.१५%	२.९०%	०.००%
१४ मालमत्ता (स्थावर+जंगम)	१,४६,९४,६२८/-	१,४७,९०,२४१/-	१,५०,८६,४५४/-	१,७२,११,३०२/-	१,७८,२१,१५८/-
१५ एकुण उत्पन्न	५,२१,२१,८३६/-	४,८६,१२,५५१/-	५,२६,००,१०७/-	६,४७,०८,२७१/-	६,७४,४९,६६०/-
१६ एकुण खर्च (तरतुदीसह)	४,५०,९८,८९६/-	४,१५,५३,४३९/-	४,५३,७०,२९४/-	५,७०,५७,३७५/-	५,५१,४१,६६८/-
१७ नफा	७०,२२,९४०/-	७०,५९,११२/-	७२,२९,८१३/-	७६,५०,८९६/-	१,२३,०७,९९१/-
१८ लाभांश	१०%	१०%	१०%	१०%	(प्रस्तावित) १०%
१९ सी.डी.रेशो	६७.६५%	७१.२३%	६९.३३%	७२.४४%	६४.१४%
२० दैनंदिन रोख तरलता (CRR)	२.५३%	२.८०%	३.८८%	४.९२%	४.८१%
२१ वैधानिक तरलता (SLR)	३५.१२%	३४.७७%	३०.०६%	२७.६९%	३४.५०%
२२ भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR)	-	-	-	१७.२५%	१७.५३%
२२ लेखापरीक्षण वर्ग	‘ अ ‘	‘ अ ‘	‘ अ ‘	‘ अ ‘	“ अ ”

अंदाज पत्रक २०२४-२५ करिता (रक्कम रु. लाखात)

अंदाजित खर्च	रक्कम	अंदाजित उत्पन्न	रक्कम
ठेवीवरील व ईतर व्याज	४१०.००	कर्ज व्याज	५९०.००
कर्मचारी पगार	९५.००	बँक गुंतवणूक व्याज	११०.००
कर्म.भ.निधी व ग्रॅच्युईटी	१५.००	ईतर उत्पन्न	२५.००
एजंट कमिशन	१०.००		
ऑडीट व प्रोफेशन फी	४.००		
टॅक्स, विमा व कार्यालय भाडे	१३.००		
स्टेशनरी छपाई व खरेदी	३.००		
लाईट,फोन व इंटरनेट	३.००		
दुरुस्ती व देखभाल	३.००		
ईतर खर्च	२५.००		
घसारा व ईतर तरतुदी	२०.००		
एकूण खर्च	६०१.००	एकूण उत्पन्न	७२५.००
नफा	१२४.००	---	--
एकूण उत्पन्न	७२५.००	एकूण उत्पन्न	७२५.००

वैधानिक लेखापरीक्षण अहवाल

PRASANNA P. KALA & ASSOCIATES
CHARTERED ACCOUNTANT
FRN : 118961W

वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कलम ८१ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम ६९ (३) अंतर्गत)

१) आम्ही, महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना, मुख्य कार्यालय मस्तगड, जुना जालना, जालना (महा) ४३१२१३ नोंदणी क्रमांक : जे.ए.एल./जे.ए.एल./आर.एस.आर./सी.आर-३४८/१९९५-९६ दिनांक १९/०२/१९९६ असून, या संस्थेचा सोबत जोडलेल्या ३१ मार्च २०२४ रोजीच्या ताळेबंदाचे आणि सोबत जोडलेल्या त्या तारखेला संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफा-तोटा पत्रकाचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. हि वित्तीय पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या प्रबंधकाची असून आमची जबाबदारी या वित्तीय पत्रकावर लेखापरीक्षणाच्या आधारे आमचे मत प्रदर्शित करण्याचे आहे.

२) आम्ही आमचे लेखापरीक्षण भारतात सामान्यत : मान्यता पावलेल्या लेखापरीक्षण मापदंडाच्या आधारे केले आहे. या मापदंडाप्रमाणे आम्हाला वित्तीय पत्रके मोठ्या दोषांपासून मुक्त असल्याचा पूर्ण विश्वास निर्माण होईल. अशा पद्धतीने लेखापरीक्षण आणि त्याची पूर्ण योजना करावी लागते. लेखापरीक्षणात चाचणी तत्वावर वित्तीय पत्रकातील रकमा आणि खुलासे यांना आधार देणाऱ्या पुराव्यांचे परीक्षण अंतर्भूत असते. लेखापरीक्षणात प्रबंधनाने केलेले महत्वाचे अंदाज, वापरलेली लेखातत्वे आणि वित्तीय पत्रकाचे एकंदरीत प्रदर्शन यांचे मूल्यमापण करणे देखील अंतर्भूत असते. आम्ही कलेले लेखापरीक्षण आमच्या मतास पुरेसा आधार देते, असा आमचा विश्वास आहे. आम्ही वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मर्यादा आणि महाराष्ट्र सक्री संस्था अधिनियम १९६० तसेच नियम १९६१ त्या अंतर्गत येणाऱ्या प्रदर्शनाच्या मर्यादा यांना अधीन राहून अहवाल देतो कि,

अ) आम्ही आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे लेखापरीक्षणकरिता आवश्यक ती सर्व माहिती व स्पष्टीकरण मिळविली आहेत.

आ) आम्ही केलेल्या परीक्षनाच्या आधारावर, आमच्या मते, आमच्या अहवालातील भाग अ, ब व क मधील टिका-टिपणीस अधीन राहून, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०, नियम १९६१ व संस्थेच्या पोटनियमानुसार आवश्यक असणारी लेखापुस्तके संस्थेने ठेवलेली आहेत.

इ) आमच्या अहवालातील भाग अ, ब व क मधील टिका- टिपणीस अधीन राहून ताळेबंद व नफा - तोटा पत्रक संस्थेच्या लेखापुस्तकाशी जुळते.

ई) आमच्या मते व आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि आम्हाला मिळालेल्या स्पस्टीकरणाप्रमाणे आणि भारतात सामान्यत : मान्यता पावलेल्या लेखातत्वाप्रमाणे आणि अहवालातील भाग अ,ब व क मधील टिका- टिपणी ना अधीन राहून, संस्थेच्या वित्तीय लेखा ताळेबंदाच्या बाबतीत ३१/०३/२०२४ रोजीची सत्य व वास्तविक आर्थिक दर्शविते. नफा - तोटा पत्रकाच्या बाबतीत त्या तारखेला संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तविक स्थिती दर्शविते.

३) नागरी सहकारी पतसंस्था यांचे लेखापरीक्षणाच्या वर्गवारीच्या निकषास अनुसरून, संस्थेस प्राप्त गुणानुसार आर्थिक वर्ष २०२३-२०२४ या कालावधीसाठी संस्थेला लेखापरीक्षण वर्ग " अ " देण्यात आला आहे.

स्थळ : जालना
दिनांक : ३०/०५/२०२४

PRASANNA P. KALA & ASSOCIATES
M.NO.104686
FRN: 118961W
Chartered Accountants

प्रसन्ना पी. काला अँड असोसिएट्स
(सनदी लेखापाल / सी.ए.)
नामतालिका क्रमांक : १७१६३ वर्गवारी : ग्रेड A-1

+91 9422291502
cappkala@gmail.com
B-402, WING 'B' , 4th FLOOR, SPACE OLYMPIA BUILDING,
SUTGIRNI CHOWK, GARKHEDA, AURANGABAD 431 009 MAH.

सन २०२३-२४ अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा अधिकचा झालेला खर्च (रक्कम रु. लाखात)

खर्च खाते तपशिल	अंदाजपत्रकीय खर्च	प्रत्यक्ष खर्च	जास्तीचा झालेला खर्च
१) दिलेले व्याज	३६३.००	४०१.९५	३८.९५
२) कर्मचारी पगार व भत्ते	८०.००	८०.०२	०.०२
३) ऑडीट व प्रोफेशन फीस	३.००	३.३२	०.३२
४) ईतर खर्च	१५.००	१८.१३	३.१३

एकत्रित ताळेबंद पत्रक [३१/०३/२०२४ अखेर] (नमुना "न")

मार्च,२०२३ अखेर	भांडवल व देणी	मार्च,२०२४ अखेर	मार्च,२०२३ अखेर	संपत्ती व येणी	मार्च,२०२४ अखेर
५,००,००,०००.००	अधिकृत भागभांडवल	५,००,००,०००.००	७,५८,१२९.५९	रोख शिल्लक	१७,११,००६.००
३,३२,०८,०००.००	वसूल भागभांडवल	३,३७,८४,०००.००	२,६१,४८,४०९.४८	बँक खाते शिल्लक	२,९०,७९,५२२.३३
१,९१,४६,७५७.००	राखीव निधी	२,११,०३,४३१.००	१४,६९,१५,१३८.००	बँक गुंतवणुक	२१,३१,०८,००८.००
४८,५०,८३,३९४.४८	ठेवी	५६,३३,१२,५८६.९२	२०,०००.००	भागातील गुंतवणुक	२०,०००.००
३६,७०,७५३.००	ठेव देणे व्याज	४१,९८,२४१.००	१,९०,३६,६९२.००	निधी गुंतवणुक	२,१०,८७,८५५.००
९,१३,०५,०२२.६२	निधी व तरतुदी	९,१५,३१,०५९.८६	५,३७,७२५.२१	ईतर गुंतवणुक	५,४९,७७५.००
२६,३८,६५५.३३	अनामती व ईतर देणी	२६,९२,१०५.३३	३९,०८,१०,२५२.४२	येणे कर्ज	४०,५८,४७,२६५.४२
७६,५०,८९६.२४	एकूण नफा	१,२३,०७,९९१.३८	३,५५,०३,६३६.००	येणे कर्ज व्याज	३,६३,४३,४३८.००
	चालू वार्षिक – १,२३,०७,९९१.३८		५७,६२,१९३.८८	ईतर येणी	३३,६१,३८७.६५
			१,०७,५९,९५२.०९	जंगम मालमत्ता	१,१३,६९,८०८.०९
			६४,५१,३५०.००	स्थावर मालमत्ता	६४,५१,३५०.००
६४,२७,०३,४७८.६७	एकूण :	७२,८९,२९,४१५.४९	६४,२७,०३,४७८.६७	एकूण :	७२,८९,२९,४१५.४९

एकत्रित नफा-तोटा पत्रक [०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४] (नमुना "न")

मार्च,२०२३ अखेर	खर्च बाजु	मार्च,२०२४ अखेर	मार्च,२०२३ अखेर	उत्पन्न बाजु	मार्च,२०२४ अखेर
३,४७,८४,५००.००	दिलेले व्याज	४,०१,९५,३६२.००	५,४१,८३,३५४.००	कर्ज व्याज	५,६७,०८,२८०.००
६७,२५,६१६.००	कर्मचारी पगार	८०,०१,८४८.००	८६,४०,७५८.००	बँक गुंतवणुकीवरील व्याज	८४,३५,९४२.००
८,४७,३५२.००	कर्म.भविष्य निधी व ग्रॅच्युईटी	९,३४,३६५.००	१८,८४,१५८.९९	ईतर उत्पन्न	२३,०५,४३७.५४
७,२४,२८०.००	एजंट कमिशन	८,२३,६०९.५०			
५८,०००.००	ऑडीट व प्रोफेशन फी	३,३२,०००.००			
९,४६,९३१.००	टॅक्स, विमा व भाडे	१०,४१,३६६.००			
३,११,१४५.९०	स्टेशनरी छपाई व खरेदी	१,९७,०७२.८६			
२,७८,४८४.०५	लाईट, फोन व इंटरनेट	२,४८,६७९.१०			
५,४१,५२६.२३	दुरुस्ती व देखभाल	२,१५,१०८.२९			
१४,३६,९९१.८९	ईतर खर्च	१८,१३,१६९.४१			
१,०४,०२,५४७.६८	घसारा व ईतर तरतूदी	१३,३९,०८८.००			
५,७०,५७,३७४.७५	एकूण खर्च	५,५१,४१,६६८.१६	६,४७,०८,२७०.९९	एकुण उत्पन्न	६,७४,४९,६५९.५४
७६,५०,८९६.२४	नफा	१,२३,०७,९९१.३८	--	--	--
६,४७,०८,२७०.९९	एकूण उत्पन्न	६,७४,४९,६५९.५४	६,४७,०८,२७०,९९	एकुण उत्पन्न	६,७४,४९,६५९.५४

उपविधी दुरुस्ती

उपविधी क्रमांक	मुळ उपविधी शब्दरचना	दुरुस्तीनंतर होणारी उपविधी शब्दरचना	दुरुस्तीचे कारण
३४ १)	**वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष साधारण सभेची सुचना :** वार्षिक साधारण सभा १४ दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सुचना देवुन बोलावली जाईल.	**वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष साधारण सभेची सुचना :** १) वार्षिक साधारण सभेची नोटीस १४ दिवस अगोदर स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. सदर नोटीस ज्या वर्तमान पत्रात प्रसिद्ध केली त्याबाबतची तसेच सभेची तारीख, वेळ, स्थळ इत्यादी बाबतची माहिती सभासदास त्यांनी संस्थेकडे नोंदवलेल्या मोबाईल नंबरवर मेसेजद्वारे (SMS) कळवावे. तसेच ज्या सभासदांना सभेची नोटीस व वार्षिक अहवाल पाहिजे असल्यास त्यांना तो उपलब्ध होण्यासाठी संस्थेचा WhatsApp मोबाईल नंबर व संस्थेचा Email ID कळवावा. जे सभासद सभेची नोटीस व वार्षिक अहवालाची WhatsApp व Email द्वारे मागणी करतील त्यांना त्यांच्या आलेल्या WhatsApp व Email ID द्वारे PDF Format मध्ये वार्षिक सभेची नोटीस व वार्षिक अहवाल देण्यात यावा.	आधुनिक डिजिटल माध्यमांचा वापर करून सभासदांना त्वरित व कमी खर्चात माहिती उपलब्ध होण्यासाठी.

२८ वा वार्षिक अहवाल

सन २०२३ - २०२४

सन्माननिय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेचा सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा अहवाल व हिशोब पत्रके, उत्पन्न खर्चाचे व महसुली खर्चाचे अंदाजपत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपल्यासमोर सादर करीत आहे.

१) **वार्षिक सर्वसाधारण सभा (अधिमंडळाची वार्षिक बैठक) :**

संस्थेच्या अधिमंडळाची २७ वी वार्षिक बैठक, अहवाल वर्षात दिनांक ०२/०७/२०२३ रोजी घेण्यात आली होती. सभेस ४२२ सभासद उपस्थित होते.

२) **संचालक मंडळ सभा :**

अहवाल वर्षात एकुण १५ संचालकांचे मंडळ कामकाज सांभाळत असून, संचालक मंडळाच्या एकुण ११ सभा झाल्या. सभेत सर्व निर्णय सर्व संचालकांच्या मंजुरीने घेण्यात आले आहेत.

३) **सभासद :**

पतसंस्थेच्या आजपर्यंतच्या प्रगतीत सर्व सभासदांचा सहभाग व मोलाची साथ मिळालेली आहे. वर्षारंभी सभासद संख्या ७०७७ होती. अहवाल वर्षात ७३९ नवीन सभासद झाले असून, २१४ सभासदांनी राजीनामे दिल्यामुळे वर्षअखेर संस्थेचे ७६०२ सभासद आहेत. सर्व सभासदांनी संस्थेत सक्रीय सहभाग घेऊन क्रियाशील सभासद व्हावे, असे आवाहन करण्यात येते.

४) **भागभांडवल :**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. ५ कोटी आहे. वर्षारंभी वसूल भागभांडवल रु. ३,३२,०८,०००/- होते. अहवाल वर्षात भागभांडवलात रु. २२,१५,०००/- जमा झाले असून, राजीनामा दिलेल्या सभासदांचे रु. १६,३९,०००/- भागरक्कम परत केली आहे. दि. ३१/०३/२०२४ अखेर रु. ३,३७,८४,०००/- वसूल भागभांडवल संस्थेकडे जमा आहे. वसूल भांडवल वाढीचे शे. प्रमाण १.७३% असून, सरासरी खेळते भांडवलाशी वसूल भांडवलाचे प्रमाण ४.८३% आहे.

५) **राखीव निधी, ईतर निधी व तरतुदी :**

संस्थेचा मागील वर्षअखेर निधी रक्कम रु. ११,०४,५१,७७९.६२/- होता. अहवाल सालात त्यामध्ये रक्कम रु. २१,८२,७११.२४ ची वाढ होऊन दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेचा निधी रु. ११,२६,३४,४९०.८६/- झाला आहे. यापैकी राखीव निधीची गुंतवणूक स्वतंत्र बँक खाती रक्कम रु. २,१०,८७,८५५/- केलेली आहे. अहवाल वर्षात संस्थेचे निधीवाढीचे शे. प्रमाण १.९८% आहे. सरासरी खेळते भांडवलाशी निधीचे शे.प्रमाण १६.१०% आहे.

६) **स्वनिधी :**

संस्थेचा मागील वर्षअखेर स्वनिधी रक्कम रु. ७,५७,७३,२१८/- होता. अहवाल सालात त्यामध्ये रक्कम रु. ७६,९०,८१३/- ची वाढ होऊन दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेचा निधी रु. ८,३४,६४,०३१/- झाला आहे. अहवाल वर्षात संस्थेचे स्वनिधीवाढीचे शे. प्रमाण १०.१५% आहे.

७) **सभासद ठेवी :**

दिनांक ३१/०३/२०२३ अखेर संस्थेच्या ठेवी रु. ४,८५०.८३ लाख होत्या. अहवाल वर्षात रु. १६,०९४.२० लाख ठेवी जमा होऊन, रु. १५,३११.९० लाख रकमेच्या ठेवी परत करण्यात आल्या. दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ५,६३३.१३ लाख इतक्या आहेत. गतवर्षीपेक्षा चालूवर्षी ठेवीत रु. ७८२.३० लाखाची वाढ झालेली आहे. ठेव वाढीचे शे. प्रमाण १६.१३% असून, सरासरी खेळते भांडवलाशी ठेवीचे शे. प्रमाण ८०.५०% आहे. अहवाल वर्षात ठेवीवर संस्थेने रु. ४०१.९५ लाख व्याज अदा केले आहे.

८) **गुंतवणुका :**

दिनांक ३१/०३/२०२३ अखेर संस्थेची गुंतवणूक रु. १,४७४.७३ लाख इतकी होती. अहवालवर्षी त्यामध्ये रु. ६६२.०५ लाखाची वाढ होऊन अहवाल वर्षअखेर गुंतवणूक रक्कम रु. २,१३६.७८ लाख इतकी झाली आहे. अहवाल वर्षात

गुंतवणूक वाढीचे शे. प्रमाण ४४.८९% आहे व सरासरी खेळत्या भांडवलाशी गुंतवणुकीचे शे. प्रमाण ३०.५४% आहे. ३१/०३/२०२४ अखेरील गुंतवणुकीचा तपशील खालीलप्रमाणे.

गुंतवणूक तपशिल	३१/०३/२०२३ अखेर	३१/०३/२०२४ अखेर
१. बँक गुंतवणूक	१४,६९,१५,१३८/-	२१,३१,०८,००८/-
२. भागातील गुंतवणुक	२०,०००/-	२०,०००/-
३. ईतर गुंतवणूक	५,३७,७२५/-	५,४९,७७५/-
एकूण :	१४,७४,७२,८६३/-	२१,३६,७७,७८३/-

९) सभासद कर्ज :

दिनांक ३१/०३/२०२३ अखेर संस्थेची सभासद कर्ज येणे बाकी ३,९०८.१० लाख इतकी होती. अहवाल वर्षात रु. ४,४७७.९५ लाख इतके कर्ज वाटप करण्यात येऊन रु. ४,३२७.५८ लाख इतकी कर्ज वसुली करण्यात आली. दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेची कर्ज येणे बाकी रु. ४,०५८.४७ लाख इतकी आहे. सरासरी खेळत्या भांडवलाशी येणे कर्जाचे शे. प्रमाण ५८.००% आहे. संस्थेने सभासदांची कर्जविषयक गरज, परतफेड क्षमता, उपविधीतील कर्जविषयक नियम आणि ठेवीदारांच्या उपलब्ध ठेवींची सुरक्षितता अशी चौपदरी सांगड घालणारे कर्जवाटप धोरण निश्चित केलेले आहे.

एकुण ३०४२ येणे कर्जदार खाती असून गतवर्षीपेक्षा येणे कर्जरकमेत रु. १५०.३७ लाखाने वाढ झालेली आहे. एकुण कर्जापैकी तारणी कर्ज रु. ३,४३९.३२ लाख असून, एकुण कर्जाशी शे. प्रमाण ८४.७४% आहे. विनातारणी कर्ज रक्कम रु. ६१९.१५ लाख असून शे. प्रमाण १५.२६% आहे.

१०) संचालक व त्यांचे कुटुंबीय यांचे कर्ज :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२)(एक) व सभा सूचनापत्रातील विषय क्र. १० नुसार संचालक व त्यांचे कुटुंबीय यांची कर्जे दिनांक ३१/०३/२०२४ अखेर खालील प्रमाणे असून, संपूर्ण येणे कर्ज हे तारणी कर्ज आहेत.

(आकडे रु. लाखात)

तपशिल	दि.३१/०३/२०२३ अखेर येणे कर्ज	२०२३-२४ मधील		दि. ३१/०३/२०२४ अखेर			
		वाटप कर्ज	वसूल कर्ज	कर्जदार	कर्ज रक्कम	थकीत रक्कम	थकबाकी
संचालक	--	१०.००	९.७७	१	०.२३	--	--
कुटुंबिय सदस्य	४.५१	--	४.५१	--	--	निरंक	निरंक
एकुण :	४.५१	१०.००	१४.२८	१	०.२३	--	--

संचालक व त्यांचे कुटुंबीय यांचेकडील कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ०.०१% आहे.

११) थकबाकी व एन.पी.ए. :

दिनांक ३१/०३/२०२४ अखेर संस्थेची एकुण येणे कर्जबाकी रु. ४,०५८.४७ लाख इतकी असून त्यापैकी रक्कम रु. २७५.५५ लाख इतकी एन.पी.ए. थकबाकी आहे. एकुण कर्ज येणे बाकीशी एन.पी.ए.थकबाकीचे (ग्रॉस एनपीए) शे.प्रमाण ६.७९% इतके आहे. गतवर्षीपेक्षा यावर्षीच्या एन.पी.ए. प्रमाणामध्ये ४.५०% ने घट झालेली आहे. ढोबळ व निष्क्रिय जिंदगीचे प्रमाण सहकार खात्याचे निर्देशानुसार ५% चे आत असणे आवश्यक आहे. संस्थेने एन.पी.ए. निधीची रु. ३३७.६७ लाखाची तरतूद केलेली आहे. त्यामुळे संस्थेचा निव्वळ (नेट) एन.पी.ए. (-१.६७% म्हणजेच) ०.००% आहे. तर एनपीए खात्यावरील व्याज रु. १६५.३१ लाख तरतूद करावी लागली आहे. त्यामुळे थकबाकीदार कर्जदार सभासद व त्यांचे जामीनदार यांनी त्यांचेकडील थकीत कर्जरकमेचा भरणा करून, एन.पी.ए. चे प्रमाण कमी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येते. तसेच संस्थेने नियमाप्रमाणे उत्तम जिंदगी रु. १०.०० लाखाची तरतुद केलेली आहे.

१२) ठेवी व कर्ज प्रमाण (C.D. Ratio) :

शासनाचे निकषानुसार व दिलेल्या सूत्रानुसार सी.डी.रेशोचे प्रमाण ६०% ते ७०% दरम्यान असावयास पाहिजे. संस्थेचे अहवाल वर्षअखेर ठेव व कर्जाचे (सी.डी.रेशो) प्रमाण ६४.१४% असून सदरचे प्रमाण हे शासनाने निर्धारित केलेले सी.डी. रेशोच्या प्रमाणात आहे.

१३) सरासरी खेळते भांडवल :

दि. ३१/०३/२०२३ अखेर संस्थेचे सरासरी खेळते भांडवल रु. ६३,२८,२६,१४६/- होते. दि. ३१/०३/२०२४ अखेरचे सरासरी खेळते भांडवल रु. ६९,९७,३५,०२५/- इतके आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलात रु. ६,६९,०८,८७९/- ने उल्लेखनीय वाढ झालेली असून वाढीचे प्रमाण १०.५७% आहे.

१४) लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २०२३-२४ चे वैधानिक लेखापरिक्षण सी.ए. प्रसन्ना पी. काला अँड असोसिएट्स, सनदी लेखापाल, छत्रपती संभाजीनगर, यांनी केले असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. संस्थेच्या अहवाल सालातील कामकाजाचे सुयोग्य मूल्यमापन करत असतांना शासनाचे ऑडीट मुल्यांकन प्रणालीनुसार ९४.३०% गुण देऊन सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षासाठी संस्थेस ऑडीट वर्ग " अ " दिलेला आहे. लेखापरिक्षण कालावधीत त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

१५) कर्मचारी वर्ग :

संस्थेच्या यशस्वी विकासासाठी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्वाचे असते. धोरण ठरविणारे संचालक मंडळ असले तरी या धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे काम कर्मचारी वर्ग करीत असतो. कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत करून, संचालक मंडळाचे मार्गदर्शनाखाली काम केले आहे. संस्था संचालक मंडळाची ध्येय धोरणे प्रत्यक्षात कृतीत आणण्यासाठी संस्थेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहित २२ कायम व तात्पुरते कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांच्या कार्यकुशल वृत्तीमुळे संस्थेची वाटचाल विकासाकडे चालू आहे.

१६) प्रशिक्षण कार्यक्रम :

संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी ३ दिवसांचे सहकार विषयक प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. अहवाल सालात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई या प्रशिक्षण संस्थेमार्फत संस्थेच्या संचालक व कर्मचारी यांचेकरिता प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. त्यामध्ये संस्थेचे सर्व कर्मचारी व संचालक सहभागी होऊन, त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

१७) समारोप व आभार :

संस्थेची आजची नेत्रदीपक प्रगती, प्राप्त झालेला नावलौकिक, मिळालेले वैभव हे सभासदांनी संस्थेस वेळोवेळी केलेले सहकार्य, मोलाचे मार्गदर्शन व संस्थेसाठीचा त्याग याचे फलित होय. त्यामुळे प्रथमतः सर्व सभासदांना धन्यवाद देऊन आभार मानतो. व भविष्यातही अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

संस्था प्रगतीपथावर आणण्यासाठी ठेवीदार सभासदांचा सर्वात महत्वाचा वाटा असतो. यावर्षी ठेवीमध्ये झालेली भरघोस वाढ, हि ठेवीदारांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचेच प्रतिक आहे. संस्थेच्या प्रगतीमध्ये ठेवीदार सभासदांनी जो सिंहाचा वाट उचलला आहे त्याबद्दल संस्था त्यांचे शतशः आभार मानून, ठेवीदाराच्या विश्वासास नेहमीच पात्र राहील अशी ग्वाही देतो.

संस्थेच्या बहुसंख्य सभासदांनी घेतलेल्या व जामीनदार असलेल्या कर्जाची वेळेवर व नियमित कर्जहफ्ते भरून संस्थेस वेळोवेळी सहकार्य केले, त्याबद्दल संस्था त्यांचेही आभार मानते व भविष्यातही असेच सहकार्य राहील हि अपेक्षा बाळगते.

मा. जिल्हा ऊपनिबंधक, सहकारी संस्था, जालना, मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, जालना, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जालना व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडेरेशन लि. यांनी संस्थेस वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. संस्थेचे नोकरदार सभासदांची कर्जाची गरज भागविण्यासाठी कर्जकपातीची हमी घेऊन व त्यानुसार वेळोवेळी कर्जहफ्ते कपात करून संस्थेकडे भरण्यासाठी सतत सहकार्य करणारे वेतनअधिकारी, कार्यालय प्रमुख, मुख्याध्यापक, अहरण व वितरण अधिकारी तसेच विविध शासकीय व निमशासकीय पगारपत्रक गटप्रमुख यांचेही संस्था मनःपूर्वक आभार मानते.

संस्थेच्या सर्व शाखांचे पालक संचालक व स्थानिक शाखा सल्लागार मंडळाने संस्थेस वेळोवेळी मार्गदर्शन करून शाखा वृद्धीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत, मी त्यांनाही धन्यवाद देऊन आभार व्यक्त करतो. संस्थेचे कायदा सल्लागार, पॅनलवरील वकील, इंजिनियर, गोल्ड व्हॅल्युअर यांनी संस्थेच्या प्रत्यक्ष कामकाजात सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही संस्था आभार मानते.

संस्थेची यापुढेही उत्तरोत्तर आर्थिक उन्नती होवो व सर्व सभासदांमध्ये बंधुभाव कायम राहून सहकार्याची भावना वृद्धिंगत होवो, हि सदिच्छा व्यक्त करून आम्ही हा अहवाल पूर्ण करीत आहोत. जय सहकार !

आपला स्नेहांकित,
दादाराव तुपकर
अध्यक्ष

* श्रद्धांजली *

अहवाल सालात दिवंगत झालेले विविध क्षेत्रातील मान्यवर,
सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, थोर साहित्यिक,
ज्ञात-अज्ञात थोर विचारवंत, भारतभूमीचे रक्षण करतांना व
दहशतवाद्यांशी सामना करतांना शहीद झालेल्या जवानांना
तसेच दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, यांना
आम्ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.
दिवंगतांच्या कुटुंबियांच्या दु:खात महालक्ष्मी पतसंस्था परिवार सहभागी असून,
मृतांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

बुक पोस्ट

श्री व श्रीमती --

महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना

(नोंदणी क्र. जेएएल/जेएएल/आरएसआर/सीआर/348/1995-96, दि.19/02/1996)

मुख्य कार्यालय : मस्तगड, जालना

संपर्क क्र. : 75593 94857

Email : mahalaxmi.jalna@gmail.com